किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक

३● चर्चा
५● 'त्या' तरुणांची शोधयात्रा
१३● स्मरण, प्रेरक आणि मार्गदर्शक बोलांचे...
१७● अर्थबोधपत्रिका पुरवणी
*बदलता ग्रामीण भारत*
१८● आरेखन आव्हानांचे...
२७● ...आकलन संधींचे

खंड १४ : अंक ६ सप्टेंबर २०१५

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

वार्षिक वर्गणी १००/- रुपये (**परदेशस्थ वाचकांसाठी $ २०**) वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.** **'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १४ (अंक ६) सप्टेंबर २०१५**
**संपादक - अभय टिळक**
**निर्मिती-सहभाग - गिरिजा देशमुख**

*अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# चर्चा

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे संस्थापक आणि आपल्या देशातील एक नामवंत अर्थतज्ज्ञ प्रा. वि. म. दांडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी आयोजित करण्यात येणारे दोन दिवसांचे राष्ट्रीय चर्चासत्र हे संस्थेच्या कामकाजाचे एक वैशिष्ट्यपूर्ण अंग होय. यंदाचे हे राष्ट्रीय चर्चासत्र ३१ जुलै व १ ऑगस्ट २०१५ या दोन दिवशी संस्थेच्या पुण्यातील वास्तूमध्ये आयोजित करण्यात आले होते. चर्चासत्रासाठी एखादा बीजविषय निश्चित करून त्या संदर्भात तयार केलेल्या बीजटिपणाच्या आधारे देशभरातून निमंत्रित केलेल्या अभ्यासक-संशोधकांनी चर्चासत्रादरम्यान सखोल विचारविनिमय करायचा, असा या चर्चासत्राचा सर्वसाधारणपणे बाज असतो. निवडलेल्या बीजविषयाच्या विविध अंगांबाबत वस्तुनिष्ठ, निकोप, अभिनिवेशरहित आणि अनाग्रही चर्चा घडून यावी, हा दरवर्षीच्या या विचारमंथनाचा हेतू. निश्चित केलेल्या बीजविषयाबाबत आपापल्या ठिकाणी अध्ययन-अध्यापन-संशोधन यांत मग्न असलेल्या देशभरातील अभ्यासकांना बीजटिपण अगोदर पाठवले जाते व त्या संदर्भात त्यांची निरीक्षणे, प्रतिपादने, मते मागवून त्यांबाबतही ऊहापोह करण्याचा परिपाठ संस्थेने पूर्वापार जपलेला आहे. आमंत्रित संशोधकांनी, तज्ज्ञांनी शोधनिबंध सादर करून त्यांच्या अनुषंगाने चर्चा करण्याच्या इतरत्र रूढ कार्यपद्धतीपेक्षा भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या वार्षिक चर्चासत्राचे रंगरूप निराळे राहत आलेले आहे. परंतु, यंदाच्या या चर्चासत्राचा ढाचा मात्र अंमळ निराळा होता. दोन दिवस आयोजित करण्यात आलेल्या या चर्चासत्रामध्ये या वर्षी संस्थेच्या एकूण सात संलग्न अभ्यासकांनी (ॲफिलिएट फेलोज्) त्यांच्या अभ्यासावर आधारित निबंधांचे सादरीकरण केले. साहजिकच, हे सगळे विषय परस्परांपेक्षा वेगळे होते. या चर्चासत्रादरम्यान झालेल्या सादरीकरणांचा व त्यांच्या आधारे झालेल्या विचारविमर्शाचा गोषवारा या अंकापासून सादर करण्याचा मानस आहे. आपल्या देशातील ग्रामीण भागाशी संबंधित अभ्यासांवर बेतलेल्या सादरीकरणांच्या अंतरंगापासून आपण सुरुवात करणार आहोत. त्याचाच पहिला भाग मांडला आहे इथे. ■■



# वाचकांचा प्रतिसाद

'अर्थबोधपत्रिके'चा जुलै २०१५चा अंक नेहमीप्रमाणे उत्तम आहेच.

त्या अंकातील, गोधनाची घटती संख्या या लेखाबाबत माझे काही विचार असेः 'गोधन' हा शब्द खूप अर्थपूर्ण आहे. आपल्या परंपरेत गाईची तुलना अन्य धनाच्या बरोबरीने केलेली आहे. गाईमध्ये ३३ कोटी देव आहेत, या धारणेची शब्दशः चिरफाड करून गाईचे महत्त्व कमी होत नाही. शास्त्रीय दृष्टिकोन व सामाजिक रूढ अर्थ, शब्दावली यांचा सोयीस्कर संदर्भ न घेता सांख्यिकी गणनेचे विश्लेषण होणे गरजेचे वाटते. लेखामध्ये निष्कर्षाप्रत येताना दोन महत्त्वपूर्ण मुद्दे राहून गेले असे वाटते. एक म्हणजे, 'ए-वन' व 'ए-टू' गाईंचे दूध हा मुद्दा सध्या जगभर गाजतो आहे. या चर्चेदरम्यान, भारतीय गोवंश हा जगामध्ये पहिल्या क्रमांकाचा मानला गेलेला आहे. ***(कृपया पृष्ठ क्रमांक १६ पाहावे).***

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

सामाजिक

# ‘त्या’ तरुणांची शोधयात्रा

आपला देश १९४७ साली स्वतंत्र झाला त्या वर्षी जन्माला आलेली पिढी आता सत्तरीकडे झुकली आहे. देश स्वतंत्र झाल्यानंतरच्या गेल्या सत्तर वर्षांच्या काळात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. देशाच्या इतिहास आणि भूगोलात बरेच चढ-उतार येऊन गेले. हे सगळे चढ-उतार या पिढीच्या वैयक्तिक आयुष्यातही आले. कारण देशाच्या जडणघडणीचा काळ हा या पिढीच्या जडणघडणीचा काळ होता. म्हणूनच या पिढीला आपले भविष्य घडवताना या देशाचे भविष्य घडवण्याचीही संधी होती आणि काही अंशी ती त्यांची जबाबदारीही होती. तारुण्याच्या काळात सगळ्यांनाच मोठी मोठी स्वप्ने पडतात. इथे तर केवळ स्वतःचेच नाही तर उभ्या देशाचे भविष्यच या पिढीच्या हातात होते. ऐन तारुण्यात असताना ही पिढी कसा विचार करत होती, देशाविषयी त्यांच्या भावना काय होत्या याची जिज्ञासा म्हणूनच काही जणांना वाटली आणि त्यातूनच ‘I am 20’ या लघुपटाचा जन्म झाला.

ही पिढी १९६७ साली २० वर्षांची होती, तेव्हा फिल्म्स डिव्हिजनच्या एस. के. एस. शास्त्री यांनी या पिढीच्या काही प्रतिनिधींना बोलते केले. त्यांना त्यांच्या देशाविषयी, त्याच्या भविष्याविषयी वाटणा-या भावना जाणून घेतल्या आणि एक सुरेख दस्तऐवज ठरेल असा लघुपट तयार केला. १९ मिनिटांच्या या लघुपटात स्वतः शास्त्री कधीही पडद्यावर येत नाहीत. पण, यात सहभागी मुलांनी दिलेल्या उत्तरांतून, त्यांनी व्यक्त केलेल्या मतांमधून शास्त्रींनी त्यांना काय प्रश्न विचारले असतील याचा अंदाज आपल्याला येतो. ‘स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या वीस वर्षांत भारताने किती प्रगती केली आहे’, ‘या देशातील इथून पुढच्या वास्तव्यात तुम्हाला काय हवे आहे,’ ‘दोन दशकांपूर्वीच्या आयुष्यापेक्षा आत्ताचे आयुष्य जास्त सुखी आणि समाधानी आहे का’, ‘कोणत्या समस्या आजही भारताला भेडसावत आहेत’, ‘स्वातंत्र्याचा अर्थ तुम्हाला काय अभिप्रेत आहे’ तसेच, तुमचा देश तुमच्यासाठी



नक्की काय आहे, अशा प्रकारचे ते प्रश्न असावेत. या लघुपटात दाखवलेल्या पुलावरून धावणा-या आगगाड्या, समुद्रकिना-यावरील माडांची झाडे, खेडी, शेते, कारखाने, लोकनृत्य करणारे आदिवासी स्त्री-पुरुष, कसोटी क्रिकेट खेळणारे पतौडीचे नबाब, या सर्व त्या वेळच्या उगवत्या भारताच्या प्रतिमा आहेत आणि पाहणा-याला त्या साठच्या दशकातील शांत आणि धीम्या काळात घेऊन जातात.

फिल्म्स डिव्हिजनच्या इतर लघुपटांप्रमाणेच हा कृष्णधवल चित्रपट सुरुवातीची काही वर्षे चित्रपटगृहांत मुख्य खेळापूर्वी दाखवला जात असे. नंतरच्या काळात तो दूरचित्रवाणीवरही दाखवला जाई. २०१३ सालच्या सप्टेंबर महिन्यात फिल्म्स डिव्हिजनने त्यांची ही निर्मिती यू ट्यूबवर टाकली आणि हा लघुपट सर्वांना पाहण्यासाठी खुला झाला. त्याच दरम्यान ‘इकॉनॉमिस्ट’ या नियतकालिकाचे पत्रकार समंथा सुब्रमण्यम यांच्या पाहण्यात हा लघुपट आला आणि त्याने त्यांना झपाटून टाकले. समंथा सुब्रमण्यम यांनी हा लघुपट पाहिला तेव्हा या लघुपटाच्या निर्मितीला जवळपास पन्नास वर्षे पूर्ण होत आली होती. पण लघुपट बनवला तेव्हा आणि समंथा यांनी तो २०१३ मध्ये पाहिला तेव्हा देशातील परिस्थितीत फारसा फरक नव्हता. १९६७ साली देशात लोकशाहीचे पर्व असले तरी चीन विरुध्दचा पराभव आणि पाकिस्तान बरोबरचे युध्द यांच्या धक्क्यातून देश सावरत होता. स्वतंत्र भारताचे आशादायी चित्र दाखवणा-या नेहरूंचे नुकतेच निधन झाले होते. १९६६ सालच्या दुष्काळात दोन हजारांपेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला होता. शेतकरी आणि कारखानदार अडचणीत होते. पश्चिम बंगालमध्ये साम्यवादी गटाने हिंसाचाराचे रान माजवले होते. थोडक्यात, अविश्वास आणि असहिष्णुतेचे वातावरण सगळीकडे होते.

समंथा म्हणतात की, त्यांनी ‘I am 20’ हा लघुपट २०१३ च्या हिवाळ्यात पाहिला तेव्हाही भारतात उदासपर्वच होते. वाईट बातम्या रोज कानांवर आदळत होत्या. भ्रष्टाचार शिखरावर पोचला होता आणि आर्थिक प्रगती खुंटली होती. अशा परिस्थितीत येऊ घातलेल्या निवडणुकांविषयी कुणालाच फारसा उत्साह नव्हता. लघुपट पाहिल्यानंतर समंथांना दोन्ही परिस्थितींमध्ये असलेले साधर्म्य जाणवले. आजच्या पिढीच्या आणि देशाच्या

समस्याच या लघुपटात मांडल्या आहेत की काय असे त्यांना वाटले. समंथा म्हणतात, “इतिहासाची पुनरावृत्ती होते असे ऐकले होते. पण या लघुपटाच्या निमित्ताने मी त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.” या सगळ्या पार्श्वभूमीवर या लघुपटात सहभागी झालेले तरूण त्या वेळच्या देशातील समस्यांकडे, देशाच्या भविष्याकडे कसे पाहात होते हे पाहणे समंथांना रंजक वाटले. त्यांचे समस्यांना भिडण्याचे मार्ग, त्यांना या समस्यांचा सामना करायचा आहे की तो न करताच परदेशात जाऊन स्वतःचे वेगळे आयुष्य सुरू करायचे आहे या विषयीची त्यांची मते, यां सारख्या प्रश्नांची उत्तरे समंथांना या लघुपटातून मिळाली होती. पण त्या वेळी देशातील त्या परिस्थितीला अनुसरून उत्तरे देणारे हे तरूण आज काय करत आहेत, त्या वेळी देशाच्या आणि स्वतःच्या भविष्याला अनुसरून त्यांनी जे मार्ग आखले होते किंवा बोलून दाखवले होते, त्या मार्गावरूनच ते गेले की त्यांनीही देशाच्या भविष्याचा फारसा विचार न करता आपल्यापुरता फायदेशीर मार्ग निवडला, हे जाणून घेणे समंथांना जास्त उद्‌बोधक वाटले. म्हणूनच हा लघुपट पाहिल्यानंतर त्यांनी लगेचच यातील सहभागी (आता साठीच्या उत्तरार्धात पोचलेल्या) तरुणांचा शोध घेण्याचे काम सुरू केले.

या लघुपटात वेगवेगळ्या स्तरांतील तरूण-तरुणी येतात आणि आपली मनोगते व्यक्त करतात. वाद्य वाजवणारा एक तरूण आपल्याच धुंदीत सांगतो की, त्याला त्याच्या या देशाविषयी आजिबात प्रेम वाटत नाही. तर एक तरुणी म्हणते, “मी ठिकठिकाणी लागलेल्या लांबच लांब रांगा पाहते, तेव्हा आपण भारतात राहतोय याचे मला भान येते. येथील लोक फारच सहनशील आहेत.” अभियांत्रिकीला शिकणारा एक विद्यार्थी येथील परिस्थितीने उद्विग्न होऊन म्हणतो, “या देशात स्वातंत्र्य म्हणजे उपासमारीचे स्वातंत्र्य, अर्धनग्न राहण्याचे स्वातंत्र्य, अशिक्षित राहण्याचे स्वातंत्र्य....!” काहींच्या तक्रारी विद्यापीठांत द्यायला लागणा-या लाचेबद्दल आहेत तर काहींना वाढती लोकसंख्या चिंतेचा विषय वाटतो. खेड्यातील लोक त्यांच्या समस्यांविषयी, शेतीच्या अपु-या साधनांविषयी बोलतात. त्यांच्या बोलण्यात कटुता नाही पण आशावादही नाही. काही तरूण मात्र भलतेच आशावादी आहेत. त्यातीलच एकजण म्हणतो, “मला तरुणपणीच



खूप श्रीमंत व्हायचे आहे. मी सुखासीन आयुष्याचा चाहता आहे.” या लघुपटात प्रत्येक तीन तरुणांमागील एक जण प्रादेशिक भाषेत बोलतो. बाकी सर्वजण इंग्रजीमध्ये संभाषण करतात. इंग्रजी बोलणारा हा वर्ग सुशिक्षित आहे, जाणकार आहे. पण ब-याचदा वाटते की, त्यांच्या स्वतःच्या विचारांपेक्षा त्यांची ‘पंडिती विद्वत्ता’च त्यांच्या तोंडून बोलते आहे. तरीही एखाद्या अवचित प्रसंगी हे तरूण एखादा सूज्ञ विचार बोलून दाखवतात आणि पाहणा-याला अंतर्मुख करतात.

या लघुपटात डझनावारी तरूण भेटतात. हे सर्वच पाहणा-यांच्या लक्षात राहात नाहीत. पण त्यांच्यातील एक चेहरा मात्र लघुपट पाहिल्यानंतर चिरकाल स्मरणात राहतो. निमुळता चेहरा, समोरच्या माणसाचा ठाव घेणारे डोळे, दाट केस आणि बोलताना हातातील जाड फ्रेमचा काळा चष्मा सतत फिरवण्याची लकब. ‘माझे नाव टी. एन. सुब्रमण्यम !’ तो तरूण आपली ओळख करुन देतो. समंथा त्याला या चित्रपटाचा नायक संबोधतात. अत्यंत स्पष्ट आणि स्वच्छ शब्दांत तो आपले म्हणणे मांडतो. दिग्दर्शक असलेल्या शास्त्रींनाही त्याचे कौतुक आहे. सुब्रमण्यमची तर्कशुध्द मांडणी त्याच्या विचारातील स्पष्टता दाखवते. तो स्वतःला अनोळखी प्रदेशात भटकंती करायला निघालेला भटक्या मानतो. ब-याच प्रमाणात अनोळखी असलेल्या या देशाची भटकंती करण्यासाठी तो उत्सुक आहे. हा देश फिरून त्याला स्वतःचाच शोध घ्यायचा आहे. आपल्या देशबांधवांच्या व्यथा, संताप, स्वप्ने त्याला जाणून घ्यायची आहेत. त्यांची आनंद गाणी ऐकायची आहेत. तो म्हणतो, “आयुष्याच्या उत्तरार्धात जेव्हा जेव्हा माझ्या अनुभवाचे हे संचित मी उघडेन, तेव्हा हा देश माझा आणि मी या देशाचा भाग आहोत याची मला जाणीव होत राहील.” त्याच्या मते आपला वर्तमान अनिश्चित आहे, डळमळीत आहे, म्हणूनच भविष्य आशादायी आहे. या चित्रफितीतील शेवटचे शब्दही त्याचेच आहेत. तो म्हणतो, “या देशातील ज्या लोकांना उत्कर्षाची, प्रगतीची आशा नाही, त्यांनी हा देश सोडून जायला हरकत नाही. मी मात्र येथेच राहणार. कारण इथेच राहून देशाचे भवितव्य घडवणे हा एक मोठा प्रयोग आहे आणि त्याचा भाग व्हायला मला निश्चितच आवडेल.” समंथा म्हणतात की, मी या तरुणाकडे

नकळत ओढला गेलो. मला खरे तर या चित्रफितीतील प्रत्येकाविषयीच कुतुहल होते. आशावादी आणि निराशावादी, विचारी आणि उध्दट, सर्वांनाच भेटण्याची उत्सुकता होती. त्यामुळेच या चित्रपटातील तरूण-तरुणींचा शोध घेणे ही कामगिरी नव्याने मी माझ्यावर लादून घेती. गेल्या ५० वर्षांत त्यांनी कशी मार्गक्रमणा केली याचा शोध मला घ्यायचा होता.

फिल्म्स डिव्हिजनच्या संग्रहालयात या विषयी काही सविस्तर माहिती मिळेल, असे वाटल्याने समंथांनी या संग्रहालयाला सुरुवातीला भेट दिली. पण इतर सरकारी कार्यालयात येणारा अनुभव त्यांना याही संस्थेमध्ये आला. कालांतराने, एके दिवशी या चित्रपटातील शैलेश गांधी यांचे ओझरते दर्शन त्यांना यू ट्यूबवरील अन्य एका फिल्ममध्ये झाले. समंथांचे नशीब जोरावर होते. शैलेश गांधी भारत सरकारमध्ये माहिती अधिक्षक म्हणून कार्यरत असल्याने समंथांना त्यांचा ठावठिकाणा शोधणे सोपे गेले. त्यांनी गांधींना फोन करायचा अवकाश आणि या चित्रपटातील बरीच नावे आणि त्यांचे दूरध्वनी क्रमांक यांची जंत्रीच त्यांनी समंथांच्या हातात ठेवली. चित्रपटातील दुनू रॉय, व्हिक्टर मेनेझेस, आशुतोष हळदीपूर हे सर्वजण त्यांच्या चांगल्या संपर्कात होते.

शास्त्रींना सुरुवातीला १५ ऑगस्ट १९४७ या दिवशीच जन्मलेल्या तरुणांच्या मुलाखती हव्या होत्या. पण लवकरच यातील मर्यादा त्यांच्या लक्षात आली. रस्त्यावर भेटणा-या काही तरुणांच्या मुलाखतीही त्यांनी घेतल्या. पण त्यांच्या उत्तरांनी त्यांचे फारसे समाधान झाले नाही. म्हणून अखेरीला ते आय. आय. टी सारख्या नावाजलेल्या संस्थेत गेले. तेथील हुशार विद्यार्थ्यांची मते त्यांना जाणून घ्यायची होती. शैलेश गांधी त्या वेळी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष होते. त्यांनीच शास्त्रींना आजूबाजूच्या परिस्थितीबाबत स्वतःची मते, विचार असणा-या ब-याच मित्रांची ओळख करून दिली. त्यांच्या मुलाखतींमधून शास्त्रींना त्यांचा चित्रपट ख-या अर्थाने सापडला.

गांधींच्या मदतीनेच समंथा यांनी त्यांच्या बाकीच्या मित्रांचा शोध घेतला. पण वाद्य वाजवणारा, स्वतःच्या धुंदी असणारा तो तरूण आणि येथील 'लांबच लांब रांगांना वैतागलेली' तरुणी यांचा शोध मात्र त्यांना लागला नाही. समंथा म्हणतात, "प्रत्यक्ष भेटीत शैलेश गांधी सुस्वभावी



आणि मोकळे वाटले. ५० वर्षांत त्यांच्यात फारसा बदल झालेला नव्हता. १९६७ चे वर्ष त्यांना चांगलेच आठवत होते. या काळातील सामाजिक उलथापालथी, अन्याय आणि गरीबी पाहून त्यांच्या मनाला विषण्णता आली होती. ही परिस्थिती जणू कधीच बदलणार नाही असेच त्यांना वाटत होते."

गांधींच्या मते त्यांची तरुण पिढी त्या वेळी एका नव्या वळणावर उभी होती. येथून पुढच्या काळात जुनी मूल्ये, तत्त्वे कुचकामी ठरणार होती. तशीच परिस्थिती थोड्याफार फरकाने आजही आहे. उलट, १९६७ पेक्षा ती जास्त गंभीर आहे. गेल्या दोन दशकांतील तत्त्वे आणि मूल्ये ढासळत आहेत. हे असेच चालू राहिले तर भारताच्या प्रगतीचा आलेख खाली यायला वेळ लागणात नाही. पण परिस्थिती बदलण्याची क्षमता आपल्यामध्ये आहे. आपण फक्त त्या दृष्टीने प्रयत्न करायला हवेत आणि संयम ठेवायला हवा. देशांतर्गत सुधारणेसाठी खूप मोठा काळ जावा लागतो. मानवी आयुष्य त्या मानाने खूप मर्यादित असते. त्यामुळे आपल्या हयातीतच सुधारणा झाल्या पाहिजेत अशी अटकळ बांधणे चुकीचे आहे.

व्हिक्टर मेनेझेस आणि आशुतोष हळदीपूर यांच्यासारखे गांधींचे मित्र कालांतराने अमेरिकेला गेले आणि तेथेच स्थायिक झाले. 'I am 20'मध्ये व्हिक्टर मेनेझेस साहेबाच्या मुलीशी लग्न करण्यास उत्सुक असलेले बिनधास्त तरुण म्हणून भेटतात. ते पुढे 'सिटीग्रुप' चे वरिष्ठ उपअधिक्षक म्हणून नावारूपाला आले. परदेशातून फोनवरच त्यांनी देशाच्या आजवरच्या प्रगतीविषयीची मते व्यक्त केली. "भारताचा जगातील नावलौकिक, येथे तयार होणारी उत्पादने, विद्यापीठांतील शिक्षण यांच्यात गेल्या काही वर्षांत नेत्रदीपक प्रगती झाली आहे. आज जगातील बहुतेक अव्वल कंपन्यांत वरिष्ठ पदांवर तुम्हाला कुठला ना कुठला भारतीय दिसेल." भारतातील गेल्या ५० वर्षांतील प्रगतीविषयी मेनेझेस भरभरून बोलले. पण, समंथा यांना हा दृष्टिकोन अर्थातच पटला नाही, तो संकुचित आणि सोयीचा वाटला. त्याच दिवशी समंथा गांधींचे आणखी एक मित्र दुनू रॉय यांना भेटण्यासाठी त्यांच्या नवी दिल्लीतील कार्यालयात गेले. कार्यालयाच्या जवळच चालू असलेल्या बांधकामामुळे इतस्ततः पसरलेला

राडारोडा आणि धुळीने काळी पडलेली कार्यालयाची इमारत पाहून रॉय यांची 'तत्त्वे' मेनेझेस यांच्या 'नेत्रदीपक तत्त्वां'पेक्षा वेगळी असावीत याची समंथांना खात्री पटली. रॉय यांचे कार्यालय म्हणजे माणसांनी आणि संगणकांनी भरलेली एक खोली होती. व्यवस्थित मागे वळवलेल्या चंदेरी केसांचे रॉय पाहून 'I am 20' मधील बोलक्या डोळ्यांचा तरूण तो हाच का, असा प्रश्न समंथांना पडला.

रॉय आयआयटीमधून बाहेर पडले आणि ग्रामीण विकासाच्या क्षेत्रामध्ये त्यांनी आपला मार्ग शोधला. देशाच्या मध्यवर्ती भागातील एका शहरात १७ वर्षे त्यांचे वास्तव्य होते. या काळात त्यांनी खेड्यातील लोकांच्या आयुष्याला दिशा देण्याचे काम केले. अभियंत्यांना त्यांच्या समस्यांवर तोडगा शोधण्यासाठी मदत केली. आजही ते शहरातील निम्न आर्थिक स्तरांतील लोकांच्या उन्नतीसाठी काम करत आहेत. रॉय यांच्या मते या वर्गातील लोक हे शहरी लोकांच्या जाणिवेच्या परिघावरच असतात. त्यांना आत प्रवेश नसतो. देशात चकचकीत क्रांती झाली म्हणून यांच्या आयुष्यात कोणताही परिवर्तनाचा प्रकाश आलेला नसतो. या असमानतेला आपली अर्थव्यवस्थाच जबाबदार आहे, असे ते मानतात.

या समाजसमूहांच्या लेखी प्रगती म्हणजे 'प्रयत्न आणि त्रुटी' (Trial and Error) यांचे अव्याहत चाललेले चक्र आहे. ते म्हणतात, "साठच्या दशकात सामाजिक आणि राजकीय स्थित्यंतरांचा काळ होता. तेव्हा लोक म्हणाले, 'हे उपयोगाचे नाही. आपण दुसरे पर्याय शोधू.' अशाच प्रकारचा काळ नव्वदच्या दशकात पुन्हा निर्माण झाला आणि तसाच तो आजही निर्माण झाला आहे. सरकारने आपला भ्रमनिरास केला आहे. यातून बाहेर पडण्यासाठी आपण पर्यायांची चाचपणी करतोय. परंतु एक नक्की, प्रश्न जितका गहन असेल, तितका त्याला मिळणारा प्रतिसादही निर्मितीक्षम असतो." थोडक्यात, सध्याचा काळ रॉय यांच्या दृष्टीने सर्जनशील पर्यायांच्या शोधाला अनुकूल असा काळ आहे.

'I am 20' मध्ये शैलेश गांधी यांनी तत्कालीन परिस्थितीचे मर्मज्ञ मूल्यमापन केले होते. आज देशात जर तीच परिस्थिती असेल तर त्यांची पिढी या मूल्यमापनावर उपाय शोधण्यात अपूरी पडली असे म्हणायचे का,



यावर गांधी म्हणतात, "माझ्या आजूबाजूला असणारा देश अजूनही मोडकळीला आलेल्या अवस्थेत आहे. याचे कारण आमची पिढी हा देश दुरुस्त करण्यात कमी पडली." आपल्या पिढीची ही चूक दुरुस्त करण्यासाठी गांधींनी स्वतःचा व्यवसाय विकला आणि ते पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. सध्या ते माहिती अधिकारासाठी काम करत आहेत. त्यांच्या मते आज सगळ्यांनाच एक प्रकारची हतबलता आली आहे. ती झटकली पाहिजे आणि सरकारला चांगली कामे करण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. आजच्या पिढीमध्ये ही बांधिलकी आपण निर्माण करायला हवी. त्यांची मुलगी परत न येण्याच्या इराद्याने अमेरिकेला गेली. तिला प्रामाणिक आणि सुखी आयुष्य जगायचे आहे आणि इथे राहून ते शक्य नाही असे तिचे म्हणणे आहे. गांधी म्हणतात की, येथील खूप गोष्टी चुकीच्या आहेत, वाईट आहेत. त्यांना बदलायला हवे आहे. हा बदल नागरिक म्हणून आपण घडवू शकतो. माझ्या बायकोवर आणि मुलीवर माझे प्रेम आहे. ती माझी बायको आणि मुलगी आहे, हे एकच कारण काही त्यामागे नाही. जगातील त्या सर्वश्रेष्ठ व्यक्ती आहेत, असाही दावा नाही. त्याच धर्तीवर, माझ्या देशावर माझा विश्वास आहे कारण तो माझा देश आहे.

या सगळ्या घटना घडत असताना चित्रपटात सर्वाधिक भाव खाऊन गेलेला शास्त्रीचा नायक टी. एन. सुब्रमण्यम याचा ठावठिकाणा मात्र समंथांना लागत नव्हता. आयआयटीतून बाहेर पडल्यानंतर कुणाशीही त्यांचा संपर्क नव्हता. या बाबतीत गुगलवरचा शोधही विफल ठरला. थोडक्यात, 'I am 20'चा नायक हरवला होता. त्यांच्या मित्रांकडून त्यांच्याविषयी ब-याच गोष्टी कानावर आल्या होत्या. स्वतः रॉय त्यांना एक दुर्मिळ प्रतिभावंत मानत. त्यांच्या मते तर्कनिष्ठ विचारांमुळे टी. एन. सुब्रमण्यम यांच्या बुध्दीला धार आली होती. पण त्यांचे ते तर्कनिष्ठ विचार वास्तवाला फारसे लागू पडण्यासारखे नव्हते. त्यांच्या विचारांतील अस्वस्थता त्यांच्या देहबोलीतून जाणवायची. महाविद्यालयाचे तास बुडवून कट्टयावर चर्चांत वेळ घालवला तरी त्यांनी आपली अव्वल श्रेणी कधी घसरु दिली नव्हती. स्वतःची हुशारी सिध्द करण्याची एकही संधी ते दवडत नसत. ***(कृपया पृष्ठ ३१ वर पाहावे)***

उजळणी

# स्मरण, प्रेरक आणि मार्गदर्शक बोलांचे...

बाबासाहेबांचे या ठिकाणी उद्‌धृत केलेले उद्‌गार अतिशय वेगळ्या कोटीतील आहेत. जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ, धुरंधर राजकारणपटू, संघर्षशील समाजसुधारक ही बाबासाहेबांची आपल्यापैकी सगळ्यांनाच ज्ञात असलेली रूपे होत. बाबसाहेबांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वात बहरलेला प्रगल्भ, विचक्षण बुद्धीचा धर्मशोधक, संस्कृतीचा अभ्यासक आणि इतिहासाचा डोळस परिशीलनकार मात्र त्या तुलनेत आपल्याला अज्ञात राहतो. पूर्वकाळात होऊन गेलेल्या संतमंडळाने त्या त्या काळात तत्कालीन समाजाला अथवा आपल्या अनुयायांना शिकवलेल्या शिकवणुकीचे, प्रसृत केलेल्या बोधाचे उपयोजन आजच्या पिढ्यांनी त्यांच्या समकालीन जीवनव्यवहारात कशा पद्धतीने करावे, हा सार्वकालीक आणि सार्वत्रिक अशा स्वरूपाचा प्रश्न ठरतो. भगवान बुद्धांनी त्यांच्या शिष्याला केलेल्या उपदेशातून, स्वतःचे आत्मभान जागृत करत एक खंबीर, स्वायत्त व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रेरणा आजच्या पिढ्यांना कशा प्रकारे घेता येईल, याचे विवेचन करणारे बाबासाहेबांचे पुढील कथन त्या दृष्टीने मननीय ठरते. तर, संतांच्या मांदियाळीने या भूमीमध्ये उभारलेल्या चळवळीचे आकलन करून घेत असतानाच अध्ययनामध्ये इतिहासदृष्टी कशी बाळगावी, याचा वस्तुपाठ म्हणजे बाबासाहेबांचे इथे नमूद केलेले दुसरे वक्तव्य. त्याच वेळी, दिखाऊ संतत्वाच्या नावाखाली समाजात बोकाळलेल्या दांभिकपणावर त्यांच्या काळात तुटून पडणारे बाबासाहेब आजचा अधिकच फैलावलेला भोंदूपणा पाहून काय म्हणाले असते, असा विचारही मनात उमटल्याखेरीज राहत नाही.

***(१) सत्यास शरण जा ! दुस-या कशासही शरण जाऊनका !...***

*"भगवान बुद्धाने आपल्या भिक्षु संघास परिनिर्वाणाच्या पूर्वी जो उपदेश केला व ज्याचा 'महापरिनिर्वाण सुत्ता'त उल्लेख केलेला आहे त्याची मला आठवण होते. एकदा भगवान नुकतेच दुखण्यातून उठल्यामुळे विहाराच्या छायेत पसरलेल्या आसनावर बसले असताना त्यांचा शिष्य*



*आयुष्यमान आनंद भगवंताकडे येऊन त्यांना अभिवादन करून एके बाजूस बसला आणि म्हणाला, "भगवंतास मी सुखात असताना पाहिले आहे व आजारी असताना पाहिले आहे. भगवंताच्या आजाराने माझे शरीर शिशासारखे जड झाले आहे. मला दिशाभ्रम झाला आहे, मला धर्मही सुचत नाही, परंतु त्यातल्या त्यात मला एवढे समाधान वाटते की, भिक्षु संघाविषयी काही तरी सांगितल्याशिवाय भगवंताचे परिनिर्वाण व्हायचे नाही".* *भगवान बुद्धाने उत्तर दिले, "आनंदा भिक्षू संघास मजपासून काय हवे आहे ? आनंदा मी आत बाहेर काही न ठेवता धर्मोपदेश केला आहे. त्यात तथागताने आचार्यसूप्ति मुळीच ठेवली नाही. तर मग आनंदा, तथागत भिक्षूविषयी काय सांगणार ? तेव्हा आनंदा, तुम्ही सूर्याप्रमाणे स्वयंप्रकाशित व्हा ! पृथ्वीप्रमाणे परप्रकाशित राहू नका ! स्वतःवरच विश्वास ठेवा, दुस-या कोणाच्या अंकीत होऊनका ! सत्याला धरून राहा ! सत्याचाच आश्रय करा व दुस-या कोणाला शरण जावू नका !". मी देखील बुद्धाच्याच शब्दांचा आश्रय करून तुम्हाला असा निरोप देतो की तुम्ही आपले आधार व्हा ! तुम्हीच स्वतःच्या बुद्धीला शरण जा ! दुस-या कोणाचाही उपदेश ऐकू नका ! दुस-या कोणालाही वश होऊनका ! "सत्याचा आधार घ्या ! सत्यास शरण जा ! दुस-या कशासही शरण जाऊनका !"... हा भगवान बुद्धाचा उपदेश तुम्ही या प्रसंगी ध्यानात ठेवाल तर माझी खात्री आहे की तुमचा निर्णय चुकीचा होणार नाही".*

***(२) संतावर समाजाची जबाबदारी असली पाहिजे...***

*"मी जरी स्वतः साधु नसलो, तरी माझे घराणे साधुचे आहे. माझ्या घराण्यामध्ये जवळजवळ तीन पिढ्यापर्यंत मोठी माणसे साधु होऊन गेली. माझ्या आयुष्यातील बराचसा भाग संतसमागमात गेलेला आहे. साधुंच्या हातून आपल्याला पुष्कळशी कामगिरी करून घेता येईल असे मला वाटते... आपल्यातील संत लोकांनी एक मोठी कामगिरी केली आहे. हिंदू धर्मात शूद्र लोकांना विद्या मिळण्याचा अधिकार नव्हता. एवढेच नव्हे तर तुम्ही मनुस्मृती चाळली, तर तीत तुम्हाला एक गोष्ट आढळून येईल की, त्या मनुस्मृतीत जो कोणी शूद्र वेदाध्ययन करील, त्याची जीभ कापून टाकावी, त्याच्या कानात गरम शिशाचा रस ओतावा, असे उल्लेख*

*आढळतात. या संत समाजाने अस्पृश्य वर्गाला ज्ञान देण्याचे महत्कार्य केले. त्यांनी केलेल श्रम व सोसलेला छळ अवर्णनीय आहे. शूद्रांनी ज्ञान संपादन करू नये, यासाठी हिंदू धर्माने केलेल्या कडेकोट बंदोबस्तातून व कोंडमा-यातून या लोकांनी ज्ञान प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांची ज्ञानलालसा फारच मोठी होती. याच समाजाने काही धार्मिक ग्रंथ असे लिहिले आहेत की, तसे ग्रंथ मिळणे आज कठीण जाईल. आज अनेक अस्पृश्य संतांजवळ कित्येक हस्तलिखित पुरातन ग्रंथ आहेत, तसे हिंदू धर्माच्या अभिमान्यांजवळही नसतील. या संत समाजाने अस्पृश्यांना जे ज्ञान दिले, त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी राहिले पाहिजे.*

*संत समाजाची आज आपल्याला काय जरूरी आहे, याचा आपण विचार केला पाहिजे. संत समाजाची स्थापना प्रथम भगवान बुद्धाने केली. त्यांच्या काळी त्या समाजाला भिक्षु समाज असे म्हणत असत. भगवान बुद्धाने भिक्षु समाज का स्थापन केला ? त्याचे कारण असे की, समाजातील सर्व लोक प्रपंचात सापडल्यामुळे त्यांची बौद्धिक वाढ होत नाही. तो समाज सत्याला तसाच समाजाला पारखा होतो. या करिता स्वार्थरहित असा आदर्श समाज असावा, या विचाराने बुद्धाने भिक्षु समाज स्थापन केला. त्याने भिक्षुंवर अनेक निर्बंध घातले. त्याचे कारण असे की, त्यांचे मन संसारात परत गुरफटू नये. भिक्षुंचे मुख्य कार्य स्वधर्माचा प्रचार व प्रसार करणे हे होते. आजचा हा संत समाज बुद्धाच्या वेळी असलेल्या भिक्षु समाजाचेच परंतु दुर्धारलेले स्थित्यंतर आहे. मुळची भिक्षुत्वाची कल्पना नष्ट झाली असून, तो एक उदर भरण्याचा धंदा होऊन बसला आहे.*

*संतावर समाजाची जबाबदारी असली पाहिजे. परंतु आजचे साधु लोक काय करतात ? अंगाला राख फासून समाजापासून दूर राहतात. निव्वळ जटा, दाढी, माळा, रंगीत फडकी ह्या बाह्य लक्षणांनी खरा साधु होत नाही. समाजात जिकडे तिकडे अधोगती झालेली दिसून येते. समाजात ठिकठिकाणी जुलूम-जबरदस्ती केली जाते. समाजात होत असलेला अन्याय, जोर-जुलूम यांचा प्रतिकार करणे साधुंचे कर्तव्य आहे. तेच लोककल्याण आहे, तीच खरी लोकसेवा आहे... आज केवळ साधुत्त्वाचा सांगाडा राहिला आहे. आज स्वार्थत्यागाला महत्त्व आहे. नुसत्या माळांना नाही".* ■■



# वाचकांचा प्रतिसाद

***( पृष्ठ क्रमांक ४ वरून)***

न्यूझीलंड हा देश भारतीय गोवंशाचे दूध चीनला निर्यात करतो आहे, हे वास्तव डोळेझांक करण्यासारखे निश्चितच नाही. हा झाला पहिला मुद्दा.

दुसरे म्हणजे, गाईपासून मिळणारे शेणखत. एक गाय दरवर्षी साधारणपणे सरासरीने तीन टन इतके शेणखत देते. आता यांतही पुन्हा दोन उपमुद्दे अंतर्भूत आहेत. तीन टन शेणखत हे रासायनिक खताला पर्याय ठरते. त्यांमुळे, शेणखताचा वापर केल्याने रासायनिक खताची किती मात्रा वाचू शकेल, याचाही विचार आपण करायला हवा. रासायनिक खतांची निर्मिती व आयात यासाठी बहुमोल असे परकीय चलन आपण वापरतो. त्यांमुळे, गाईपासून मिळणा-या शेणखताचा वापर केल्याने देशाचे किती परकीय चलन वाचेल, याचाही हिशेब मांडला गेला पाहिजे. शेणखत आणि रासायनिक खते यांची शास्त्रोक्त तुलना करून सर अल्बर्ट हॉवर्ड यांनी १९३८ साली लिहिलेल्या 'ॲन ॲग्रिकल्चरल टेस्टामेन्ट' या ग्रंथातील त्यांचे निष्कर्ष आज आपण वास्तवात अनुभवतो आहोत. सर हॉवर्ड यांच्या प्रतिपादनानुसार, रासायनिक खते प्रथम जमिनीची प्रकृती बिघडवतील आणि त्यांमुळे, यथावकाश, त्या जमिनीवरील वनस्पती व वनस्पतींवर निर्भर असलेल्या प्राणिमात्रांचे आरोग्य धोक्यात येईल.

एक गाय दररोज सरासरीने १० किलो शेण देते. त्यांपासून ३०० लिटर गोबरगॅस हे गणितही तितकेच महत्त्वाचे आहे. देशी गाईंचे पालन गेली २० वर्षे करण्याच्या माझ्या अनुभवावर ही आकडेवारी आधारित आहे. ३०० लिटर गोबरगॅस एक चूल एक तास पेटती ठेवतो.

सांख्यिकी विश्लेषण आवश्यक आहे, यांबाबत दुमत अजिबातच नाही. परंतु, सध्याच्या विशेषज्ञांच्या (स्पेशालिस्ट्स्) जमान्यात एकात्मिक (होलिस्टिक) विचारपद्धती आपण जणू विसरत चाललो आहोत. त्यांमुळे फक्त समस्याच तेवढ्या वाढताना दिसतात. आपली जीवनपद्धती, शेती, गाई अशा अनेकविध पैलूंचा एकात्मिक विचार करणे गरजेचे वाटते.

**विनायक श्रीकृष्ण महाजन, कुडावळे, तालुका दापोली.**

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## बदलता ग्रामीण भारतः आव्हाने आणि संधी

आपल्या देशातील ग्रामीण वास्तव झपाट्याने बदलते आहे. खेड्यांचा तोंडवळा पालटत असल्याच्या खुणा ठायीठायी दिसतात. साहजिकच, ग्रामीण विकास या संज्ञा-संकल्पनेलाही बदलते आयाम आता लाभत आहेत. ग्रामीण परिवर्तनाच्या कार्यात सक्रिय असणा-या संस्था, व्यक्ती अशा सगळ्यांनाच ग्रामीण जीवनातील बदलत्या प्रवाहांचे आकलन नव्याने करून घेणे भाग पडावे, असेच हे सारे चित्र दिसते. परिवर्तनाच्या प्रवाहांचे बदलणारे रंग, त्यांचे अंतःप्रवाह यांची नीट ओळख करून घेऊन इथून पुढच्या काळात ग्रामीण विकासासाठी करावयाच्या उपाययोजनांची फेरआखणी त्यांबरहुकूम करणे, आता दिवसेंदिवस अनिवार्य ठरते आहे. कारण, ग्रामीण भारतामध्ये साकारत असलेल्या बहुआयामी बदलांच्या कुशीतून नित्यनवी आव्हाने दिसामाशी पुढ्यात उभी ठाकत आहेत. अर्थात, निरंतर आव्हानांच्या जोडीनेच समृद्धी व विकासाच्या अनंत संधीही अनेक रूपांनी सामो-या येत असल्याचा अनुभवही सार्वत्रिक आहे. त्यांमुळे, ही आव्हाने व नव्याने उभरत असलेल्या संधी यांचे रंगरूप हेरून ग्रामीण विकासासाठी येत्या काळात अवलंबाव्या लागणा-या व्यूहरचनेचा चेहरामोहरा त्यांनुसार बदलत राहणे, इथून पुढे केवळ अगत्याचेच नव्हे तर अपरिहार्य ठरत जाईल. मुळात, विकास हीच एक बहुमिती आणि गुंतागुंतीची, गतिमान प्रक्रिया होय. अनंत प्रकारचे ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, प्रादेशिक, पर्यावरणीय प्रभाव त्या त्या विभागातील सर्वसाधारण आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचे अंतरंग आणि बहिरंग निश्चित करत असतात. या घटकांदरम्यान नांदणारे नातेही विलक्षण गुंतागुंतीचे आणि बहुस्तरीय असते. ग्रामीण विकासाचा गाडा गतिमान करण्यासाठी सिद्ध होऊपाहणा-या कोणालाही या व्यामिश्र वास्तवाचे सम्यक् भान हे ठेवावेच लागते.



**(अ) आरेखन आव्हानांचे...**

ग्रामीण भारतामध्ये साकारत असलेल्या बदलांचे आरेखन करण्यापासून या ऊहापोहास इथे प्रारंभ केलेला आहे. बदलांच्या कुशीतून निपजणा-या संधींचा परिचय करून घ्यायचा आहे त्यानंतर. ग्रामीण जीवनात साकारत असलेल्या बदलांच्या परिणामांचे विश्लेषण करावयाचे तर त्या बदलांमागील कारक घटकांची चर्चा प्रथम करणे भाग पडते. ग्रामीण जीवनाचा पोत बदलण्यास कारणभूत ठरणारे घटक अंतर्गत आणि बाह्य अशा दोन्ही गटांतील दिसतात. इथून पुढे आधी आढावा घेऊ तो अंतर्गत घटकांचा आणि त्यांतून निपजणा-या आव्हानांचाः

**(१) शेतीप्रधान रोजगारः** आपल्या देशात २०११ साली झालेल्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार नागरीकरणाची सरासरी पातळी ३१ टक्क्यांच्या घरात आहे. म्हणजेच, ६९ टक्के लोकसंख्या आजही खेड्यांतच राहते. शेती हा आजही ग्रामीण लोकसंख्येचा उपजीविकेचा प्रधान व्यवसाय दिसतो. परंतु, त्याच शेतीचा देशाच्या ठोकळ उत्पादनामधील वाटा मात्र उतरलेला आहे अवघ्या १४ टक्क्यांवर. आपल्या देशातून केल्या जाणा-या निर्यातीमध्ये शेतीजन्य जिनसांच्या निर्यातीचा वाटा आहे ११ टक्क्यांच्या घरात. केवळ इतकेच नाही तर, उद्योगधंद्यांसाठी आवश्यक असणा-या अनेक प्रकारच्या कच्च्या मालाचा पुरवठा शेतीमधूनच होतो. साहजिकच, ग्रामीण भारतामध्ये वास करणा-या जनसामान्यांच्या उत्पन्नामध्ये आणि क्रयशक्तीमध्ये वाढ घडवून आणावयाची तर शेतीचा दमदार विकास ही त्याची पूर्वअट ठरते. देशाच्या ठोकळ उत्पादितामधील शेतीचा वाटा जरी तुलनेने अल्पस्वल्प दिसला तरी, ग्रामीण भारतामधील रोजगार मात्र शेतीप्रधानच आहे. आजही देशाच्या पातळीवर सरासरीने ५२-५३ टक्के मुख्य श्रमिक हे शेतकरी आणि शेतमजूर अशा दोन्ही अंगांनी उपजीविकेसाठी शेतीवरच अवलंबून असल्याचे आकडेवारी सांगते. ग्रामीण भारतातील रोजगार हा मुख्यतः शेतीप्रधान दिसण्यामागील कारण हेच. शेतीवरती उपजीविकेसाठी निर्भर असलेल्या मोठ्या श्रमशक्तीची सरासरीने दुर्बळ असलेली दरडोई उत्पादकता हे भारतीय शेतीचे एक मोठे शबलस्थान होय. शेतीमध्ये गुंतलेल्या श्रमशक्तीची अशक्त उत्पादकता हे एक मोठे दुर्धर आव्हान ठरते ते त्यांपायीच.

(२) **खंडविखंड शेती:** रोजीरोटीसाठी शेतीवरतीच अवलंबून असणारी मोठी ग्रामीण लोकसंख्या आणि बिगर शेतीक्षेत्रातील उद्योगव्यवसायांमधील रोजगार संधींचा ग्रामीण भारतातील तोकडा विस्तार यांमुळे शेतकरी कुटुंबांतील दर नवीन पिढीमध्ये कुटुंबातील जमिनीचे वाटप होत राहते. आता, खेडोपाडीही विभक्त कुटुंबपद्धती वेगाने पसरते आहे. त्यांमुळे तर या प्रक्रियेला अधिकच खतपाणी मिळताना दिसते. याचा एक अतिशय स्वाभाविक परिणाम म्हणजे, आपल्या देशात लागवडीखाली असलेल्या एकंदर क्षेत्रापैकी मोठे क्षेत्र लहानसहान तुकड्या-तुकड्यांत केल्या जाणा-या शेतीने व्यापलेले आहे. दर शेतकरी कुटुंबामागे सरासरीने असणारे लागण क्षेत्र एक हेक्टरपेक्षा कमी असेल तर अशी कुटुंबे अत्यल्प भूधारक कुटुंबे म्हणून गणली जातात. तर, एक हेक्टरपेक्षा अधिक परंतु दोन हेक्टरपर्यंत लागण क्षेत्र पदरी असणा-या कुटुंबांची गणना अल्प भूधारक शेतकरी कुटुंबांमध्ये केली जाते. २०१०-११ या वर्षी आपल्या देशात घेतल्या गेलेल्या कृषी जनगणनेनुसार, एकूणांतील जवळपास ८५ टक्के शेतकरी हे अत्यल्प आणि अल्प भूधारक शेतकरी म्हणून गणले गेले. म्हणजे, आपल्या देशातील ८५ टक्के शेतक-यांकडे सरासरीने दोन हेक्टरपर्यंतच लागण क्षेत्र आहे. लागवडीखाली आपल्या देशात असणा-या एकंदर क्षेत्रापैकी ४४ टक्के क्षेत्र या प्रकारच्या शेतीचे आहे. हे तुकडेही पुन्हा विखुरलेले असतात. तुलनेने शेतक-यांच्या खूप मोठ्या वर्गाची सरासरीने असणारी अतिशय तुटपुंजी जमीनधारणा हा आपल्या देशातील शेतीची उत्पादकता आणि पर्यायाने उत्पादन वाढवण्याच्या मार्गातील मुख्य अडसर ठरतो.

सन २०१०-११ मधील कृषी जनगणनेद्वारे या संदर्भात हाती येणारी आकडेवारी खरोखरच शोचनीय अशी आहे. दर शेतकरी कुटुंबामागील सरासरी लागण क्षेत्रामध्ये क्रमाने घट होण्याचे सत्र आपल्या देशात थेट १९७०-७१ सालापासून अव्याहत सुरू असल्याचे संबंधित आकडेवारीवर नजर फिरवली की स्पष्ट होते. दर शेतकरी कुटुंबामागील सरासरी लागण क्षेत्राचे आकारमान आपल्या देशात १९७०-७१ या वर्षी होते २.८२ हेक्टर इतके. तेच क्षेत्र १९८०-८१ या वर्षात १.८४ हेक्टरपर्यंत घटले. त्या पुढील दशकात ते आणखी घसरून १९९०-९१ या वर्षी ते सरासरीने १.५५



हेक्टरपर्यंत आले. त्या नंतर दहा वर्षांनी, म्हणजे, २०००-०१ या वर्षात हे सरासरी लागण क्षेत्र १.३३ हेक्टरवर आले. आणि आता, २०१०-११ या वर्षासाठीच्या आकडेवारीनुसार हे सरासरी लागण क्षेत्र दिसते अवघे १.१६ हेक्टर इतके ! यामुळे एक उद्योग या रूपात शेती हा पर्याय शेतक-यांच्या लेखी फारसा किफायतशीर आणि म्हणूनच आकर्षक राहिलेला नाही. अत्यल्प तसेच अल्प भूधारक कुटुंबांमध्ये घरातील तुटपुंज्या शेतीवर बहुधा घरातील माणसेच राबतात. आता, विभक्त कुटुंबपद्धतीचा फैलाव सर्वदूर झालेला असल्याने घरातील शेतीला होणारा कौटुंबिक श्रमांचा पुरवठाही खुंटतो आहे. त्यांमुळे, रोजंदारीवर श्रमिक नेमून शेती करणे लहान शेतक-यांना अवघडच नव्हे तर दुरापास्त होऊन बसते आहे. त्यांतच, ग्रामीण भागातील श्रमिकही अलीकडे परिसरातील बिगर शेती उद्योगव्यवसायांमध्ये रोजीरोटीचा पर्याय धुंडाळण्यासाठी वळत आहेत. त्यांमुळे तर शेतीला होणा-या एकंदरच श्रमपुरवठ्यात घट होते आहे. याचा स्वाभाविक परिणाम मजुरीच्या दरांवर घडून येतो. मग, रोजंदारीवर मजूर मिळत असले तरी त्यांना कामावर नेमणे लहान शेतक-यांना परवडत नाही. शेतीच्या तुकड्यांचे सरासरी आकारमान इतके घटलेले आहे की, श्रमशक्तीच्या जागी यंत्रशक्ती नियुक्त करून शेती करण्याचा पर्यायही आताशा उरलेला नाही. भारतामधील शेतीमध्ये नांदणा-या अनेकानेक संरचनात्मक समस्यांचे मुख्य मूळ याच तिढ्यामध्ये सापडते.

(३) **पावसाधारित शेती:** आपल्या देशात लागवडीखाली दरवर्षी सरासरीने येणा-या क्षेत्रापैकी जवळपास ६३ टक्के क्षेत्र आजही पूर्णतः पावसावरच अवलंबून आहे. त्यांतच, एकंदर नैसर्गिक साधनसामग्रीचा -हास अलीकडील काही वर्षांत अतिशय वेगाने घडून येताना दिसतो. त्यांमुळे, पाण्याची उपलब्धता हा ग्रामीण भागासह सर्वत्रच एक मोठा गंभीर प्रश्न होऊ पाहतो आहे. परिणामी, वरून पडणा-या पावसाच्या प्रत्येक थेंबाची जपणूक, भूपृष्ठावरून वाहून वाया जाणा-या पावसाच्या पाण्याची साठवण, भूगर्भातील जलसाठ्यांचे पुनर्भरण, जैवसंपत्तीचे संरक्षण, निसर्गदत्त जलसाठ्यांचे संगोपन... यांसारखी उपाययोजना करणे आजच कळीचे बनलेले आहे. शेतीची सरासरी उत्पादकता वाढण्याचा संबंध या बाबींशीदेखील आहे.

(४) **कुंठित पशुधनः** शेतीचा एक पूरक जोडधंदा म्हणूनच ग्रामीण भागातील शेतकरी वर्ग दुग्धोत्पादनाकडे बघत असतो. सरासरीने बघितले तर, आपल्या देशाच्या ग्रामीण भागातील एकंदर कुटुंबांपैकी जवळपास ७० टक्के कुटुंबांना पशुपालनाच्या माध्यमातून पूरक रोजगाराचा व उत्पन्नाचा एक मार्ग उपलब्ध होतो. परंतु, आजघडीला, पदरच्या पशुधनाच्या पूर्ण क्षमतेचा पुरेपूर विनियोग करण्यापासून बहुसंख्य कुटुंबे वंचित असलेली दिसतात. जैवशास्त्रीय तसेच व्यवस्थात्मक असे दोन्ही घटक याला कारणभूत आहेत. पशुधनाची गुणवत्ता उंचावण्यासाठी आवश्यक असलेल्या तंत्रशास्त्रीय सेवांची अनुपलब्धता आणि पशुपालन व्यवसायाच्या वाढविस्तारासाठी आवश्यक असणा-या पूरक व्यावसायिक सेवा व पायाभूत सुविधांचा अभाव या दोहोंपायी या क्षेत्राच्या विकासास मर्यादा पडत असल्याचा अनुभव आहे. मुळात, आपल्या देशात उपलब्ध असणा-या परंपरागत गोधनाचा वाण फारसा दुधाळ नाही. ही मर्यादा निखळ जैवशास्त्रीय वा गुणसूत्रीय आहे. त्याच्याच जोडीने पशुवैद्यकीय सेवांचा तुटवडा, पौष्टिक चा-याची चणचण यांसारख्या अन्य अडचणींपायी दुधाच्या उत्पादनातील वाढीस कुंपणे पडतात. त्यांमुळे, दुधाच्या उत्पादनामध्ये वाढ घडून येत असली तरी मागणी व पुरवठ्यातील दरी निरुंद होताना दिसत नाही.

(५) **बदलती पीकपद्धतीः** आपल्या देशातील शेतीमध्ये राबविल्या जाणा-या पीकपद्धतीमध्येही अलीकडील काळात लक्षणीय स्वरूपाचे परिवर्तन घडून येताना दिसते. भरड अन्नधान्यपिकांच्या पारंपरिक वाणांची उपेक्षा करण्याकडे शेतकरी वर्गाचा कल झुकतो आहे. अन्नधान्यपिकांकडून शेतकरी अन्नधान्येतर पिकांच्या लागवडीकडे आपला मोहरा वळवताना दिसतात. बाजाराच्या दृष्टीने गौण परंतु पोषणाच्या दृष्टीने समृद्ध असणा-या अन्नधान्यपिकांकडे त्यांपायी घाऊक दुर्लक्ष होत असल्याचे चित्र प्रकर्षाने पुढ्यात येते. बाजारपेठीय मागणीचे कल ध्यानात घेऊन काही निवडक पिके घेण्याला शेतकरी वर्गाची पसंती लाभताना दिसते. या सगळ्यांपायी पीकपद्धतीमधील पूर्वापार विविधता हळूहळू लोप पावते आहे. नगदी पिकांना या सगळ्यांमुळे महत्त्व प्राप्त होऊन संमिश्र पीकपद्धती -हासाच्या मार्गाला लागलेली आहे किंवा कसे, अशी भीती वाटावी असे हे सारे बदल दिसतात.



या सगळ्यांमुळे एक नवीनच प्रश्न पुढ्यात उभा ठाकतो आहे. अन्नधान्याच्या उत्पादनामध्ये एकीकडे वाढ घडून येत असली तरी दुसरीकडे पोषणाची समस्या मात्र हलकी होताना दिसत नाही. शेती, शेतीतील पीकपद्धती आणि पोषण यांचा निखळलेला सांधा हा एक यक्षप्रश्न बनतो आहे. जगभरात आजघडीला असणा-या एकंदर कुपोषित बालकांपैकी जवळपास एक तृतीयांश मुले भारतामध्ये सापडतात हे वास्तव ध्यानात घेता कुपोषणाची समस्या निवारण्यामध्ये शेतीचा वाटा केंद्रवर्ती ठरतो, हे स्वाभाविक ठरते. किंबहुना, या कामात शेतीचे फार कळीचे योगदान अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्षात घडते आहे ते निराळेच. फळफळावळ आणि नगदी पिकांना बाजारभाव चांगल्यापैकी मिळत असल्याने या पिकांच्या लागवडीकडे शेतक-यांचा कल आताशा वाढतो आहे. अर्थात, त्याच वेळी सर्वसामान्य भारतीय नागरिकाच्या आहाराचा आकृतिबंधही पालटतो आहे ही वस्तुस्थिती नाकारता येण्याजोगी नाही. तृणधान्यांच्या सेवनाकडून भारतीय समाजातील काही घटक अलीकडे प्रथिनयुक्त अन्नघटकांकडे वळत असल्याचे चित्र अनेक प्रकारच्या आकडेवारीद्वारे पुढ्यात अवतरते. दूध व दुग्धजन्य पदार्थ, डाळी, कडधान्ये, फळफळावळ, हिरव्या भाज्या, मांसजन्य पदार्थ अशांसारख्या अन्नघटकांना असणारी मागणी वाढते आहे. आर्थिक पुनर्रचनेच्या प्रयोगाला १९९१ सालापासून झालेली सुरुवात, या प्रक्रियेचा लाभ मिळालेल्या समाजघटकांच्या दरडोई उत्पन्नामध्ये मधल्या काळात घडून आलेली वाढ, दृक-श्राव्य माध्यमांचा अप्रतिहत विस्तार, नागरीकरणाचा फैलाव आणि ब-यापैकी खुला झालेला आंतरराष्ट्रीय व्यापार यांसारख्या अनेकानेक घटकांचा हा संमिश्र व एकत्रित परिणाम दिसतो.

(६) **विपणन-वितरणातील अडचणीः** शीतगृहांच्या साखळीची वानवा, वातानुकूलनाची सुविधा उपलब्ध असलेल्या वाहनसुविधांचा अभाव यांसारख्या व्यवस्थात्मक अथवा संरचनात्मक शबलतांपायी शेतामध्ये तयार झालेल्या विक्रीयोग्य मालापैकी काही माल बाजारपेठेपर्यंत पोहोचू शकत नाही, ही आपल्या देशातील एक मोठीच पायाभूत असुविधा होय. या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या अभ्यासानुसार देशात उत्पादन होणा-या फळफळावळातील जवळपास ३० ते ४० टक्के फळे काढणीनंतर बाजारपेठेपर्यंत पोहोचतच नाहीत.

हाताळणी, साठवणूक, वाहतूक, प्रक्रिया यांसारख्या व्यवस्थांच्या अनुपलब्धतेपायी ती फळे एक तर शेतात अथवा प्रवासात नाश पावतात. दुधाच्याबाबतीत हेच प्रमाण भरते जवळपास १८ टक्के इतके. भौगोलिकदृष्ट्या खेडी विखुरलेली असल्याने बारमाही वाहतूकयोग्य रस्ते, दळणवळण, साठवणूक, शीतगृहे, वाहतूक, वीज यांसारख्या सेवा देशाच्या कानाकोप-यांत समान कार्यक्षमतेने पुरविण्यात अडचणी उभ्या ठाकतात. त्याचा फटका काढणी होऊ न विक्रीसाठी तयार असलेल्या शेतमालाला बसतो. त्याच वेळी, तंत्रज्ञानाचा फैलाव व बाजारपेठविषयक माहितीची कार्यक्षम देवाणघेवाण ग्रामीण भागात घडून येण्यातही अडचणी आहेत. या सगळ्याचा एकत्रित परिणाम, शेतीविषयक आकलन व शेतीसंदर्भातील विविध निर्णय तर्कशुद्धपणे घेण्याच्या शक्यता या दोन्ही बाबतींत लहान शेतक-यांच्या पदरात प्रतिकूलतेचे माप पडण्यातच होतो.

(७) **संस्थात्मक कच्चे दुवे:** भारतातील लहान शेतकरी नाडला जाण्यात संस्थात्मक कच्च्या दुव्यांचा वाटाही बराच आहे. शेतीमध्ये निर्माण झालेल्या मालामध्ये मूल्यवर्धन घडवून आणण्याच्या माफक संधी, अद्ययावत अशा बाजारपेठीय माहितीचा अभाव, बाजारभावांमध्ये होणारे चढउतार यांचे बसणारे फटके अल्प भूधारक शेतक-यांना अधिक तीव्रतेने जाणवतात. अशा प्रकारच्या माहितीचे संकलन, विश्लेषण करू न शेतक-यांना त्यांचे व्यावसायिक निर्णय अधिक नेमके व काटेकोरपणे घेता यावेत या दृष्टीने तिचा पुरवठा करणा-या संस्थात्मक यंत्रणा अथवा कार्यपद्धती आपल्या देशात मुळातच कमी अथवा विरळ आहेत. विखुरलेल्या, संख्यात्मक प्राबल्य असणा-या लहान शेतक-यांचे संघटन घडवून आणून त्यांनी निर्माण केलेल्या अल्पस्वल्प विक्रीयोग्य मालाचे संघटित विपणन व वितरण; अल्प भूधारक शेतक-यांच्या गरजेच्या असणा-या उत्पादन घटकांची संयुक्त खरेदी, लहान शेतक-यांना व्यावसायिक सल्लासेवा अशा प्रकारचे उपक्रमही आपल्या देशात फारसे कोठे दिसत नाहीत. अशा विविध बाबतींत संस्थात्मक यंत्रणा निर्माण करून त्या शेतक-यांपर्यंत पोहोचवणे हे एक मोठेच आव्हान शाबीत होते. अशा प्रकारच्या संस्थात्मक सेवांचे आधार न मिळणे हेदेखील अल्प भूधारक शेतक-यांच्या दुरवस्थेचे एक प्रमुख कारण होय.



(८) **शेतीतील मनुष्यबळाची स्त्रीप्रधानता:** आपल्या देशातील शेती महिलाप्रधान बनते आहे. शेतीमध्ये काम करणा-या एकंदर मनुष्यबळामध्ये स्त्रियांचे प्रमाण सरासरीने आहे जवळपास ३१ टक्के इतके. ग्रामीण भागांतून होणारे स्थलांतर आणि शेतीकडून बिगर शेती व्यवसायांकडे वळणारा श्रमशक्तीचा ओघ यांत पुरु षांचे प्रमाण तुलनेने खूपच मोठे असल्याने शेतीमध्ये प्रामुख्याने ग्रामीण कुटुंबांतील स्त्रियाच काम करतात, असे चित्र आताशा प्रकर्षाने दिसते. त्यांमुळे, शेतीमधील उत्पादन आणि कुटुंबाचे उत्पन्न यांत भर घालण्यात मोठा वाटा दिसतो तो ग्रामीण स्त्रीवर्गाचाच. शेतीमधील कामे ही बहुशः कष्टांची व सघन अंगमेहनतीची असतात. हा सारा भार पडतो महिलावर्गावर. त्यांमुळे, स्त्रियांच्या शारीरिक कष्टांमध्ये बचत होण्यास हातभार लावणारे, ऊर्जेची बचत व वापर कार्यक्षमपणे करणारे उत्पादनतंत्र शेतीमध्ये विकसित करण्यावर भर दिला जाण्याची गरज जाणवते. त्याच वेळी, आपल्या देशातील सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थांमधील एक उणीवही डोळ्यांना खुपत राहते. शेतीमधील कष्टांमध्ये घसघशीत वाटा उचलणा-या ग्रामीण स्त्रीला शेतीची मालकी, नियंत्रण, शेतीतील पीकपद्धतीबाबतचे निर्णय, उत्पादन तंत्राची ओळख यांसारख्या बाबींमध्ये मात्र काहीच भूमिका नसते. या क्षेत्रांतील तिचा सहभाग नगण्य आहे. किंबहुना, या संदर्भातील निर्णयप्रक्रियेत तिला जणू काही स्थानच नाही. त्यांमुळे, शेतीमधील उत्पादन वाढ, शेतीतील सुधारणा, अन्नसुरक्षा, पोषणसुरक्षा यांसारख्या बाबींची योग्य निगराणी राखली जाण्याच्या दृष्टीने भारतीय शेतीमधील महिला मनुष्यबळाचे सक्षमीकरण घडवून आणणे, हे येत्या काळातील एक मोठे आव्हानच ठरेल.

(९) **ग्रामीण तरु णाईच्या बदलत्या अपेक्षा व आकांक्षा:** 'डेमोग्राफिक डिव्हिडंड'चा लाभार्थी असलेल्या आपल्या देशातील तरु णाईच्या अपेक्षा-आकांक्षांचा पोत झपाट्याने बदलतो आहे. तरु णाईच्या महत्त्वाकांक्षांचा परीघही विस्तारताना दिसतो. उच्च शिक्षणाचे अंतरंग, दृक-श्राव्य माध्यमांद्वारे घडणारी बाहेरच्या जगाची ओळख, स्थलांतरण आणि झपाट्याने हातपाय पसरणारे नागरीकरण या सगळ्यांपायी ग्रामीण भागातील तरू ण आता शेतीमध्ये मनाने फारसा रमताना दिसत नाही, हे आजचे वास्तव आहे.

ग्रामीण अर्थकारणाचा कणा असलेल्या शेतीच्या व्यवसायाला पूर्वीची प्रतिष्ठा पुन्हा एकवार प्राप्त करून दिल्याखेरीज आजचा तरूण शेतीकडे आकर्षित होणार नाही. हे एक मोठे जटिल आव्हान होय.

(१०) **परंपरागत धारणांचा -हासः** आपल्या देशात शेती हा पूर्वापारच खासगी मालकीचा व्यवसाय राहिलेला आहे. सध्याचे युगच मुदलात खासगीकरणाची तळी उचलून धरणारे आहे. त्यांमुळे, एक व्यवसाय या नात्याने शेतीकडे बघण्याच्या दृष्टिकोनाचा पोतच मुळापासून बदलतो आहे. याचा एक अपरिहार्य परिणाम असा जाणवतो की, ग्रामीण भागांत आणि आदिवासी पट्ट्यांतही शेतीशी संलग्न अशा पारंपरिक धारणा, संकेत, परंपरा यांची वेगाने पायमल्ली घडते आहे. शेती कसण्याच्या पारंपरिक कार्यपद्धती, जलसंवर्धनाचे संचित ज्ञान, बीजसंरक्षणाच्या परंपरेने चालत आलेल्या रीती आणि स्थानिक जनसमूहांकडे पिढ्यांपिढ्यांपासून वाहत आलेला अनुभवसिद्ध ज्ञान व माहितीचा साठा यांसारख्या गोष्टींबाबतची अनास्था झपाट्याने सर्वदूर पसरत असल्याचा अनुभव येतो. त्यांतून निपजतो आहे जैवविविधतेचा -हास. केवळ इतकेच नाही तर या सगळ्यांपायी पिके, वनस्पती व प्राणी यांचे देशी वाण अस्तंगत होण्याच्या मार्गावर आहेत. त्यांमुळे या वाणांच्या गुणसूत्रांची पुंजीही नामशेष बनण्याचा धोका उद्भवतो आहे. स्थानिक लोकसमूहांची परंपरेशी असलेली नाळ अशी सर्वांगांनी विरळ होत चालल्याने बी-बियाणे, खते यांसारख्या बाबींसाठी बाजारपेठेवर असलेले शेतकरी वर्गाचे अवलंबन पूर्वीच्या तुलनेत आज किती तरी व्यापक आणि सघन बनलेले दिसते. एकीकडे त्यांपायी शेतक-यांचा उत्पादन खर्च वाढतो आहे तर दुसरीकडे जैवविविधतेचा -हास गतिमान बनण्याबरोबरच पर्यावरणीय हानीचे संकटही गहिरे बनत जाते आहे.

(११) **क्लेशांची चढती कमानः** या सगळ्या कार्यकारणभावापायी ग्रामीण भारतातील क्लेशांची कमान अलीकडील काळात सतत चढती राहिलेली दिसते. शेतक-यांचे आत्मघात ही त्याच प्रक्रियेची एक ठळक आणि जळजळीत खूण. आत्मघाताचा मार्ग जवळ करणा-या शेतक-यांमध्ये अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकरी बहुसंख्येने आहेत, ही बाब या संदर्भात अधोरेखित करावयास हवी.



आपल्या देशातील ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेवर प्रभाव टाकणारे बाह्य घटकही तितकेच महत्त्वाचे आहेत.

(१) **नैसर्गिक साधनसामग्रीचा -हासः** आपल्या देशातील निसर्गदत्त संपदेचा अलीकडील काळात अतिशय वेगाने होऊ लागलेला -हास हे ग्रामीण विकासाच्या मार्गातील एक कमालीचे दुर्धर आव्हान शाबीत होते आहे. लागवडयोग्य क्षेत्राचे आक्रसणारे आकारमान, भूपृष्ठावर असणा-या मातीच्या थराची होणारी धूप, हातपाय पसरत असलेले नापीक क्षेत्र, घटणारे आणि/ अथवा प्रदूषित होणारे नैसर्गिक जलसाठे, नष्ट होऊ पाहणारी जंगले व वनसंपत्ती... अशा अनंत रूपांनी नैसर्गिक साधनसंपदेचा -हास आपल्या पुढ्यात नित्याने अवतरतो आहे. नैसर्गिक खजिन्याचा हा -हास म्हणजे आपल्या देशातील शेतीक्षेत्राच्या उत्पादनवाढीचा वार्षिक सरासरी वेग उंचावण्याच्या मार्गातील ही एक मोठी धोंडच होय. दुसरीकडे, विजेच्या पुरवठ्यासंदर्भात सरसहा दिल्या जाणा-या तर्कहीन अनुदानांपायी भूगर्भातील पाणीसाठ्यांचा उपसा बेफामपणे केला जाताना दिसतो. देशात आजमितीस उभ्या असलेल्या एकंदर जंगलक्षेत्रापैकी जवळपास ४१ टक्के क्षेत्र आजच -हासमय गणले जाते. वनसंपत्तीचा असा क्षय ही पशुधनाच्या मुळावर येणारी बाब ठरते आहे कारण जनावरांना चा-याचा पुरवठा होत असतो तो मुख्यतः वनक्षेत्रांद्वारेच.

(२) **पर्यावरणीय चढउतार आणि हवामान पालटः** आपल्या देशातील शेती ही आजही बहुशः पावसावरच अवलंबून आहे. पावसाचे आणि विशेषतः मॉन्सूनचे चक्र अलीकडील काळात पालटताना दिसते. बदलते पर्यावरण आणि हवामानातील बदल हे विकासविषयक उपक्रमांचे सकारात्मक परिणाम निष्फळ ठरवणारे घटक म्हणून पुढे येत आहेत. पृथ्वीच्या पृष्ठभागाचे सरासरीने वाढते असलेले तापमान आणि पावसाचे प्रमाण व वृष्टीचे वेळापत्रक यांतील हेलकाव्यांची वाढलेली तीव्रता या दोहोंचे चटके व फटके शेतीक्षेत्राच्या उत्पादनाला वाढत्या वारंवारतेने बसताना दिसतात.

(३) **विकासप्रक्रियेतील प्रांतिक असमतोलः** आपल्या देशातील कृषी-पर्यावरणीय वास्तवात प्रांताप्रांतागणिक प्रचंड तफावत आढळून येते. जिथे कृषी-पर्यावरणीय घटक अनुकूल दिसतात तिथे आर्थिक विकासाची बेटे

निर्माण झालेली दिसतात. काळाच्या ओघात विकासाची प्रक्रिया त्याच केंद्रांभोवती एकवटत राहते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील प्रांतिक, भौगोलिक वा विभागीय असमतोलाची समस्या या सा-यांमुळे दिवसेंदिवस अतिशय उग्र स्वरू प धारण करत असल्याचे आपण दरदिवशी अनुभवतो आहोत. अनंत प्रकारचे सामाजिक, धार्मिक, जातीय, वांशिक आणि राजकीय ताणतणाव या असमतोलामधून प्रत्यही जन्म घेत राहतात, हे सध्याचे वास्तव होय. या सगळ्याचा एकत्रित असा प्रतिकूल परिणाम सरासरीने एकंदरच ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेवर घडून येत असला तरी, आदिवासी आणि ग्रामीण परिसरातील भूमिहीन शेतमजूर या दोन समाजघटकांना त्या प्रतिकूलतेचे चटके तुलनेने अधिक तीव्रतेने जाणवतात, ही वस्तुस्थिती अनेकानेक क्षेत्रीय अभ्यासांद्वारे प्रकाशात आलेली आहे. कोणत्याही प्रकारच्या संरक्षक कवचाचे छत्र या दोन समाजसमूहांच्या माथ्यावर नसणे, हे यांतील जटिल आव्हान. त्याच वेळी, शेतीक्षेत्राच्या जोडीनेच सर्वसाधारण अर्थकारणामध्ये जी स्थित्यंतरे अलीकडील काळात घडून आली त्यांमुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरवठा आणि अचूक व्यावसायिक निर्णयांसाठी आवश्यक असलेल्या अद्ययावत माहिती व सांख्यिकीचा प्रवाही स्त्रोत यांना शेतकरी वर्गाकडून असलेली मागणीही गुणात्मकदृष्ट्या बदललेली दिसते. ही मागणी पुरी करणे, ही बाब सोपी अजिबातच नाही.

देशातील ग्रामीण विकासाच्या गतीवर तसेच दिशेवर प्रगाढ व थेट प्रभाव पाडणा-या अंतर्गत तसेच बाह्य आव्हानांचे स्वरू प जाणून घेतल्यानंतर आता त्या आव्हानांच्या जोडीनेच क्षितिजावर उमललेल्या संधींचे आपले आकलनही अद्ययावत बनवणे संयुक्तिक ठरावे.

**(ब) ...आकलन संधींचे:** भारतातील ग्रामीण वास्तवाच्या बदलत्या तोंडवळ्यामुळे निर्माण झालेल्या अथवा होत असलेल्या संधी तंत्रज्ञानात्मक तसेच व्यवस्थापनात्मक अशा दोन्ही प्रकारच्या दिसतात. त्या आव्हानांना सक्षमपणे सामोरे जात असतानाच आजुबाजूला उमलत असलेल्या संधींचे सोने करू न घेण्यात आपण कितपत यशस्वी होतो त्यांवर उद्याच्या ग्रामीण भारताचा केवळ चेहरामोहराच नव्हे तर अंतरंगाचा पोतही अवलंबून राहणार आहे.



**(१) तंत्रशास्त्र आणि जैवतंत्रज्ञानाचे विशाल दालन:** शेतीमधील सुधारणा आणि उत्पादनवाढ यांना चालना देण्याच्या दृष्टीने प्रगत तंत्रशास्त्र आणि जैवतंत्रज्ञान यांचे उपयोजन घडवण्याच्या शक्यता अलीकडील काळात लक्षणीयरीत्या वाढलेल्या आहेत. सजीवांच्या गुणसूत्रीय आराखड्याची उकल करण्यापर्यंत या तंत्रशास्त्राने आता दौड मारलेली आहे. त्यांमुळे, मानवी आरोग्य, पशुधनातील सुधारणा, अन्नधान्योत्पादन आणि शेतीतील प्रगती साध्य करण्यास पूरक ठरणारी जैवशास्त्रीय उत्पादने निर्माण करण्याच्या शक्यतांचा परीघ आता खूपच विस्तारलेला दिसतो. विविध प्रकारचे पर्यावरणीय चढउतार सोसणारे असे पिकांचे सक्षम वाण आणि अधिक उत्पादन देऊ शकणा-या पशुधनाच्या प्रजाती विकसित करण्याच्या वाटा या तंत्रशास्त्रीय आगेकूचीमुळे आता अधिक मोकळ्या होत आहेत. शेतमाल तसेच पशुधनापासून मिळणारे जिन्नस यांच्या उत्पादनाचा पाया येत्या भविष्यात चांगल्यापैकी विस्तारण्याच्या शक्यता या वैज्ञानिक प्रगतीद्वारे आता खूपच वाढलेल्या आहेत.

**(२) संस्थात्मक जाळ्याची गुंफण:** भारतीय शेती व शेतकरी यांना साहाय्यभूत होणा-या संशोधन, अध्यापन आणि संज्ञापनप्रणाली विकसित करणा-या संस्थात्मक जाळ्याचा आपल्या देशात अलीकडील काळात घडून आलेला चौफेर विस्तार ही अशीच दुसरी संधी होय. कृषीविषयक संशोधन व अध्ययन-अध्यापन करणारी महाविद्यालये, विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था, कॉर्पोरेट विश्वाच्या माध्यमातून केले जाणारे प्रयत्न, कृषीविषयक संशोधनामध्ये केली जाणारी खासगी गुंतवणूक अशा विविध माध्यमांतून कृषीपूरक संशोधन व विकासाचे एक मोठे जाळेच जणू आपल्या देशात आजघडीला सक्रिय बनलेले दिसते. विविध प्रांतांतील शेती तसेच शेतीपूरक उद्योगांच्या पुढ्यात वेळोवेळी उभ्या ठाकणा-या विविक्षित समस्यांचे प्रथम आकलन व यथावकाश निराकरण स्थानीय परिस्थितीच्या संदर्भात करण्याच्या शक्यता या बहुमिती संस्थात्मक यंत्रणेमुळे आजघडीला चांगल्यापैकी अंकुरलेल्या दिसतात. स्थानिक स्वरू पाच्या समस्या आणि त्यांवरील उपाय यांतील सुसंवाद या अशा नेटवर्किंगमुळे अधिक परिणामकारकपणे प्रस्थापित करता येणे आता खूपच सुलभ बनलेले आहे.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील प्रादेशिक तफावतीची दरी निरुंद बनवणे या संस्थात्मक विकासाद्वारे येत्या काळात तुलनेने सोपे ठरावे, याची शाश्वती देणारा असाच हा सारा विकास होय. साहजिकच, शेतीविकासासह एकंदरच आर्थिक प्रगतीची प्रक्रिया अधिक सुसूत्रपणे, संतुलित पद्धतीने व प्रभावशाली प्रकारे गतिमान बनवण्याच्या दिशेने दमदारपणे पावले उचलण्यास या सुसंघटित अशा बहुसंस्थात्मक जाळ्यामुळे भविष्यात बळ प्राप्त व्हावे.

(३) **नवमध्यमवर्गाच्या मागणीचा बदलता आकृतिबंधः** आर्थिक पुनर्रचनेनंतर आपल्या देशात गेल्या पाव शतकादरम्यान जो नवसधन असा नवमध्यमवर्ग निर्माण झालेला दिसतो तो शेतीविकासाचा एक अतिशय कारक घटक म्हणून येत्या काळात भूमिका बजावेल असे मानण्यास भरपूर वाव आहे. नव्याने प्राप्त झालेल्या सुबत्तेमुळे या नवमध्यमवर्गातील घटकांच्या मागणीचा आणि पर्यायाने उपभोगाचा सर्वसाधारण आकृतिबंध आधीच्या पिढ्यांच्या तुलनेत खूपच निराळा आहे. त्यांत प्रादेशिक वा प्रांतिक विविधताही विपुल दिसते. एकंदर अर्थकारणातील बदलत्या प्रवाहांद्वारे या आकृतिबंधातही बदलांचे प्रवाह सक्रिय बनत आहेत. बदलती जीवनशैली, पालटते जीवनमान, माध्यमांचा विस्तार, विविध समाज व त्यांच्या चालीरीतींची होणारी वेगवान सरमिसळ यांसारख्या अनंत घटकांद्वारे या नवमध्यमवर्गाच्या आवडीनिवडींचा पटही रंगरूप बदलत राहताना दिसतो. प्रक्रियायुक्त खाद्यपेय पदार्थांना भारतीय बाजारपेठेत वाढत असलेली मागणी हा याच सगळ्या बदलांचा एक पुरावा. त्यांतून शेतमालावर प्रक्रिया करून त्याचे मूल्यवर्धन घडवून आणण्याच्या दिशा विस्तारत जात राहतील. शेती आणि उद्योग यांत या प्रक्रियेद्वारे थेट नाते निर्माण होऊन पर्यायाने शेतकरी वर्गाचे व एकंदरीने ग्रामीण घटकांचे सरासरी उत्पन्न उंचावण्याच्या वाटा या देवाणघेवाणीद्वारे रुंदावत जातील, अशी आशा पल्लवीत करणारे असेच हे बदल होत.

(४) **बिगर शेती व्यवसायसंधींचा विस्तारः** शहरी भागातील वाढत्या सुबत्तेचा व नवमध्यमवर्गाच्या पालटत्या आवडीनिवडींचा आणखी एक प्रभाव ग्रामीण अर्थकारणावर जाणवतो तो बिगर शेती उद्योगव्यवसायांच्या विकासास ग्रामीण परिसरात अधिक वाव मिळण्याद्वारे. प्रक्रिया उद्योगांद्वारे शेतमालाला अधिक चांगला बाजारभाव मिळण्याने तसेच काढणीपश्चात शेतमालाच्या



संभाव्य नासाडीमध्ये होणाऱ्या कपातीद्वारे शेतकरी वर्गाच्या हातात चार पैसे अधिक मिळण्याबरोबरच शेतमालाची काढणी, हाताळणी, निवड, वर्गीकरण, साठवणूक, 'पॅकेजिंग', वाहतूक... यांसारख्या अनंत माध्यमांद्वारे ग्रामीण परिसरात नव्याने निर्माण होणाऱ्या रोजगार संधींमुळे स्थानिक अर्थकारणात उत्पन्न तसेच रोजगाराचे गुणक (Income and employment multipliers) सक्रिय बनतात. त्यांतून ग्रामीण भागातील बिगर शेती उद्योगव्यवसायांच्या स्थापना व विस्तारास चालना मिळून शेतीवर अवलंबून असणाऱ्या अतिरिक्त मनुष्यबळास पर्यायी रोजगार स्थानिक परिसरातच उपलब्ध होणे शक्य बनते.

(५) **पूरक शासकीय धोरणेः** शेती आणि वनसंपत्तीवर उपजीविका अवलंबून असणाऱ्या समाजघटकांच्या सर्वसाधारण कल्याणाची सरासरी पातळी उंचावत राहावी यासाठी पूरक धोरणे आखण्याची तत्परता शासनसंस्था वेळोवेळी दाखवत आलेली दिसते. ग्रामीण भागातील रस्ते, नैसर्गिक जलस्त्रोत, बंधारे यांसारख्या शेतीपूरक पायाभूत सेवासुविधांच्या निर्मितीस हातभार लावणारी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, वनसंपत्तीवरील आदिवासी जनसमूहांच्या परंपरागत हक्कांची बूज राखणारा वनसंपत्ती अधिनियम... यांसारख्या उपक्रमांचा निर्देश या संदर्भात करता येईल.

नव्याने उभरत असलेल्या यांसारख्या संधींचा लाभ उठवण्यात एक समाज म्हणून आपण कितपत यशस्वी ठरतो त्यांवर ग्रामीण भारताच्या विकासाचा भविष्यकालीन तोंडवळा अवलंबून राहील. ■■

---

*भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे संस्थापक प्रा. डॉ. वि. म. दांडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संस्थेतर्फे दरवर्षी दोन दिवसांचे एक राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात येते. यंदाचे राष्ट्रीय चर्चासत्र ३१ जुलै व १ ऑगस्ट २०१५ या दोन दिवशी पार पडले. भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या नियामक मंडळाचे एक सन्मान्य सदस्य किशोर चौकर यांनी बाएफ डेव्हलपमेन्ट रीसर्च फौंडेशन या संस्थेचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. भरत काकडे आणि त्याच संस्थेतील संशोधिका डॉ. राजश्री जोशी यांच्यासह त्या चर्चासत्रात केलेल्या सादरीकरणावर प्रस्तुत मजकूर बेतलेला आहे.* ■ **संपादक**

(पृष्ठ क्रमांक १२ वरून)
आपल्या भाषाप्रभुत्वाने समोरच्यावर गारूड करण्यात त्यांचा हातखंडा होता. महाविद्यालयात असताना त्यांनी बरीच नाटके लिहिली आणि रॉय यांनी ती दिग्दर्शित केली होती. रॉय गंमतीने म्हणतात, "मी त्यांची नाटके दिग्दर्शित केली असली, तरी ती 'ॲब्सर्ड थिएटर'शी नाते सांगणारी नाटके मला फारशी कधी कळलीच नाहीत. पण प्रेक्षक मात्र नाटक बघताना भारावल्यासारखे खुर्चीला खिळून बसत."

सुब्रमण्यम यांनी या लघुपटात स्वतःचेच विचार बोलून दाखवले की नाही याची गांधींना शंका वाटते. कारण पुढच्यावर प्रभाव टाकण्यासाठी आकर्षक विचार बोलून दाखवणे ही त्यांची खासियत होती. समंथा म्हणतात, "२०१४ सालच्या फेब्रुवारी महिन्यात पाच-सहा वेळा मी माझी विनंती ट्विटरवर टाकली. बरेच लोक सुब्रमण्यम यांचे नाव गुगलवर टाकून मिळालेल्या माहितीची पाने मला पाठवून मदत करत असत. सुब्रमण्यम आयआयटीमध्ये असताना त्यांच्याच खोलीत राहणा-या एका गृहस्थांनी मला प्रतिसाद दिला. आयआयटीनंतर ते पुढच्या शिक्षणासाठी बोस्टन जवळच्या Brandeis विद्यापीठात गेले, असे त्यांच्या कानावर आले होते."

सुब्रमण्यम यांच्यापर्यंत पोहोचण्याचा एक धागा मिळाला होता. समंथांना नंतर त्यांच्याविषयी इंटरनेटवर बरीच माहिती मिळाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी मिशिगन येथील ऑकलंड विद्यापीठात अध्यापनही केले. त्या नंतर ते 'Routeone' या कंपनीत काही काळ काम करत होते. ऑकलंड विद्यापीठात असताना त्यांचे गणितविषयक नियतकालिकांत प्रसिध्द झालेले लेख समंथांनी मिळवले. 'Routeone' मध्ये काम करणा-या एका सुब्रमण्यम नामक व्यक्तीची मुलाखतही त्यांना मिळाली. या मुलाखतीतील व्यक्तीचा चेहरा सडपातळ होता, डोक्याला टक्कल पडले होते आणि तोंड किंचित वाकडे झाले होते. डोळे मात्र धारदार होते. त्यांना पाहून समंथांना 'I am 20' मधील सुब्रमण्यम यांची आठवण झाली. ती व्यक्ती म्हणजेच त्यांना हवे असलेले टी. एन. सुब्रमण्यम आहेत याची त्यांना खात्री पटली. अधाशासारखी त्यांनी ती मुलाखत वाचून काढली आणि त्यांचा भ्रमनिरास झाला. आपल्या देशात राहून त्याला घडवण्याची स्वप्ने पाहणारा, सामाजिक



बांधिलकी मानणारा तो तरूण हाच का, असा प्रश्न त्यांना पडला. त्यांच्या मनात विचार आला, 'आयुष्यात जे काही साध्य करायचे होते, ते त्यांनी खरोखरच साध्य केले का?' त्यांच्याशी प्रत्यक्ष संभाषण करावे म्हणून समंथानी 'Routeone' च्या काही अधिका-यांशी पत्रव्यवहार केला. त्यातील एकाने त्यांना त्यांचा ई-मेल दिला. पण आजारपणामुळे ते कितपत प्रतिसाद देतील अशी शंकाही व्यक्त केली. त्यांची शंका खरी ठरली. अखेरीस समंथांनी ऑकलंड विद्यापीठातील प्राध्यापकांशी पत्रव्यवहार केला. त्यातील एका प्राध्यापकांकडून त्यांना सुब्रमण्यम यांच्या घरचा दूरध्वनी मिळाला. समंथांनी त्या क्रमाकावर फोन केला. तो एका बाईंनी उचलला. सुब्रमण्यम यांच्याविषयी माहिती देण्यास त्यांनी सुरुवातीला टाळाटाळ केली. पण समंथांचा सविस्तर तपशिल ऐकून त्यांनी ते सुब्रमण्यम यांचेच निवासस्थान असल्याची कबुली दिली. पण, त्यांची प्रकृती बरी नसल्याने तुम्ही नंतर फोन करा असे सांगितले. त्या नंतर सलग तीन महिने समंथांनी दर पंधरा दिवसांनी फोन करण्याचा परिपाठ चालू केला. पण दरवेळी त्या बाई हेच सांगत राहिल्या. समंथांनी अखेर काही काळ फोन न करण्याचा निर्णय घेतला. दोन महिन्यांनी त्यांनी तो क्रमांक पुन्हा फिरवला. पण या वेळी फोनला 'आन्सरिंग मशिन' लावलेले होते. तरीही, समंथांनी प्रयत्न सोडले नाहीत. पण फोनवर उत्तर द्यायला ना त्या बाई आल्या, ना आले सुब्रमण्यम.

समंथा म्हणतात, "आता मला माझ्याच अधीरपणाचे आश्चर्य वाटायला लागले. सुब्रमण्यमकडून मला काय ऐकायचे होते? त्यांचे अमेरिकेला जाण्याचे कारण की, देश घडवण्याच्या प्रयोगातून माघार घेण्याचे कारण? अमेरिकेला जाण्याचे त्यांचे काही वेगळे प्रयोजन असेल का? आपल्या देशाच्या प्रगतीविषयी ते आजही आशावादी आहेत का? व्हिक्टर मेनेझेस यांच्याविषयीचा माझा अनुभव ताजा असताना सुब्रमण्यम यांनी दिलेल्या उत्तरांनी माझे समाधान झाले असते का? शैलेश गांधी आणि दुनू रॉय यांच्यासारख्या सक्रिय कार्यकर्त्यांकडून भारताच्या आशावादाचे चित्र रंगवले जात होते, पण ते स्वतः त्या बाबतीत चिंतित आणि साशंक होते. या दोन टोकाच्या आशावादांनी मला कोड्यात टाकले. कोणता खरा मानावा ? नंतर मात्र माझे मलाच पटले की, हा संघर्ष आता अनिवार्य आहे". ■■

### प्रमुख संदर्भ

**(A) Books/Reports -** (1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणेः भाग १ : १९२० ते १९३६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर : लेखन आणि भाषणे : खंड १८, भाग १, २००२.

•पुरवणीमध्ये सादर करण्यात आलेला मजकूर सर्वश्री किशोर चौकर, डॉ. भरत काकडे आणि डॉ. राजश्री जोशी या तिघांनी संयुक्तरीत्या सादर केलेल्या **"Changing Context of Rural India: Cahallenges and Opportunities in Rural Development"** या शीर्षकाचा संशोधनपर निबंधावर बेतलेला आहे. चर्चासत्रात सादर करण्यात आलेल्या अन्य निबंधांचा गोषवारा या पुढील अंकांमधून सादर करण्याचा मानस आहे. ■


## Poverty in India

**लेखक वि.म. दांडेकर, नीळकंठ रथ**

(पृष्ठे १४०, किंमत : २०० रुपये)

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

## दुसरी आवृत्ती प्रकाशित

***आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ***

# कर्ता-करविता

## आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**लेखक - रमेश पानसे, राज्यश्री क्षीरसागर, अनिता देशमुख-बेल्हेकर**

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

**पृष्ठे २४२** **किंमत ३५०/-रुपये**




## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी फक्त १०० / - रुपये**

**द्वैवार्षिक वर्गणी फक्त १८०/ - रुपये**

**त्रैवार्षिक वर्गणी फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट**

**पंचवार्षिक वर्गणी फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट**

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये)

(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी)

(३) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

# ग्रंथालयातील पुस्तके

**Democracy and Urban Governance in India, Rumi Aijaz, Academic Foundation, New Delhi, 2012, pp. 178.**

भारतातील शहरी भागातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. या शहरीकरणामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यातही वाढती सामाजिक आणि आर्थिक विषमता आणि शहरातील उपलब्ध साधनसामुग्री व सेवा यांची कमतरता या दोन महत्त्वाच्या गंभीर समस्या आहेत. आजची शहरी जीवनशैली आणि त्यातील गुंतागुंत पाहता शहरांचे कामकाज पाहणा-या नागरी संस्थांच्या धोरणांना, उपाययोजनांना आणि एकंदर कार्यपध्दतीला महत्त्व प्राप्त झाले आहे. याच गोष्टी डोळ्यापुढे ठेवून रुमी एजाज यांनी प्रस्तुत पुस्तक लिहिले आहे. शहरीकरण, शहरविकास, शहर व्यवस्थापन, सामाजिक विकास हे एजाज यांच्या अभ्यासाचे विषय. त्यांचे हे पुस्तक शहरी समस्यांच्या निराकरणासाठी नाविन्यपूर्ण धोरणे आणि उपाय सुचवते. आजवरचा अभ्यास असे सांगतो की, नागरी संस्थांच्या कामकाजामध्ये लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याची क्षमता उपाययोजनांमध्ये असते. पण त्या क्षमतांचा पूर्ण वापर आपण करून घेण्यात आपण कमी पडतो. कधी कमकुवत धोरणे तर कधी विचारहीन अंमलबजावणी अपयशाला कारणीभूत असते. भविष्यातील शहरी आव्हानांचा सामना करायचा असेल तर नगरनियोजन व नगरव्यवस्थापना संदर्भातील कायदे बळकट करणे, ई-गव्हर्नन्सच अवलंब केला जाणे, शहरांचे अर्थकारण सुधारणे यांच्याबरोबरीनेच धोरणांची योग्य दिशा ठरवणे तितकेच गरजेचे आहे. त्याच्या जोडीनेच शहरी कामकाजात नागरिकांचा सहभाग वाढला तर उत्तम व्यवस्थापनाबरोबरच लोकशाहीची तत्त्वे स्थानिक पातळीवर रुजविण्यात आणि राबवण्यात आपण यशस्वी होऊ. शहरी विकास आणि व्यवस्थापनाच्या दृष्टीने आवश्यक भासणा-या ध्येयधोरणे आणि उपायांचा ऊहापोह या पुस्तकात केलेला आहे. ■■



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PCW/115/2013-2015
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●विकास चित्रे ● किशोर चौकर ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा
●अभय टिळक ●रवींद्र ढोलकिया ●ललित देशपांडे ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●रूपा रेगे-नित्सुरे
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**